जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १८ दिनांक - ०६/०१/२०२४**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मोक्यातील फरार असलेला आरोपीस अटक.

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे गुन्हा रजि नंबर ६४५/२०२३ भा.दं.वि.कलम ३०७, ३८५, ३८७, ३२४, ४५२, १४३, १४४, १४७, १४८, १४९, ३२३, ५०४, ५०६(२), सह क्रि. लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ७, आर्म ॲक्ट कलम ४(२५), म पो अधि ३७(१)सह १३५, बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधि. २०१५ कलम ८३ (२) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३(१)(ii),३(२),३(४) या गुन्हयातील पाहीजे आरोपी **तुषार कृष्णा कुचेकर, वय १९ वर्षे, रा. विठ्ठल रुक्मीणी मंदीराशेजारी, शनिनगर, जांभुळवाडी, पुणे** हा गुन्हा दाखल झाल्यापासुन मिळुन येत नव्हता. त्याचा भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे शोध घेताना तो वारंवार पोलीसांनी लावलेल्या सापळयातुन निसटत होता.

आरोपी तुषार कृष्णा कुचेकर, वय १९ वर्षे, रा. विठ्ठल रुक्मीणी मंदीराशेजारी, शनिनगर, जांभुळवाडी, पुणे याचा भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार गुप्त बातमीदारांचे नेटवर्क सक्रीय करुन व तांत्रिक विश्लेषणावरुन शोध घेत असताना पोलीस अंमलदार **चेतन गोरे, अभिजीत जाधव** यांना नमुद आरोपी हा भुमकर ब्रिज,समर्थ् सोसायटी, दुसरा मजला, आंबेगाव, पुणे येथे त्याचे बहिणीस भेटण्यासाठी आला आहे अशी खात्रीलायक बातमी मिळली.

तात्काळ तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी जावुन आरोपीताचा शोध घेतला असता तो सदर ठिकाणी मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन पुढील कारवाईकामी गुन्हयाचे तपासी अधिकारी सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे.श्री.नारायण शिरगावकर यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्यांनी सदर आरोपीताला नमुद गुन्हयामध्ये अटक केली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विनायक गायकवाड,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.विजय पुराणिक, श्री.गिरीश दिघावकर,सहा.पोलीस निरीक्षक अमोल रसाळ, पोलीस उपनिरीक्षक धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार चेतन गोरे, अभिजीत जाधव, सचिन सरपाले, शैलेश साठे, महेश बारावकर, मंगेश पवार, निलेश जमदाडे, निलेश ढमढेरे, हर्षल शिंदे, अवधतु जमदाडे, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, राहुल तांबे, मितेश चोरमोले, आशिष गायकवाड, अभिनय चौधरी, विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.